


दैनिक नवीन संध्या

https://www.dailynavinsandhya.com

RNI No.MAHMAR/2010/36460
DEC. No. SDM/SR/PUNE/87/2019




वर्ष १६ ✿ अंक २८ दैनिक ✿ पुणे, गुरूवार १ जानेवारी २०२६ ✿ किंमत ३ रुपये ✿ पाने : ६

# भीमा कोरेगावमध्ये शौर्य दिनानिमित्त विजयस्तंभाला अजित पवार, प्रकाश आंबेडकरांकडून अभिवादन

**पुणे :** भीमा कोरेगाव येथे आज (१ जानेवारी) २०८ वा शौर्य दिन मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. शौर्य दिनानिमित्त लाखो भीम अनुयायी राज्यभरातून विजयस्तंभाला अभिवादन करण्यासाठी दाखल झाले आहेत. उपमुख्यमंत्री आणि पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार भीमा कोरेगाव येथे पोहोचत विजयस्तंभाला अभिवादन केले. वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनीही विजयस्तंभाला अभिवादन केले. प्रशासनाकडून तयार करण्यात आलेली तयारी पाहून प्रकाश आंबेडकर यांनी समाधान व्यक्त केले.

जातीप्रता, व्यवस्थेच्या विरोधातील हा एक लढा होता, असे प्रकाश आंबेडकर यांनी सांगितले. अजित पवार म्हणाले की, आज मी अभिवादन करण्यासाठी आलो आहे. प्रशासनाने जोरदार तयारी केली आहे. सर्व निधी या ठिकाणी देण्यात आला आहे. चांगल्या प्रकारची व्यवस्था या ठिकाणी केली आहे. दुपार नंतर गर्दी वाढेल.




**जिल्हा प्रशासनाकडून जय्यत तयारी**

जिल्हा परिषदेकडून २३ आरोग्य केंद्रे, ४३ रुग्णवाहिका, १८ खासगी रुग्णालयांतील २८६ खाटा आरक्षित, १५५ प्रशिक्षित मनुष्यबळ, उपहारगृह व टँकरकरिता ३३ तपासणी पथके, ८० घंटागाड्या, शुद्ध पाण्याच्या व्यवस्थेसाठी १५० टँकर्स, पाणी भरण्याच्या ठिकाणी २०० कर्मचारी नियुक्त, २ हजार ८०० शौचालये, २६५ सफाई कामगार, २६० पर्यवेक्षण अधिकारी व कर्मचारी, ९ हिरकणी कक्ष आदी सुविधा करण्यात आल्या आहेत. पुणे शहर पोलिस आयुक्तालयाकडून कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी १ महानिरीक्षक, ३ पोलिस उपमहानिरीक्षक, २० पोलिस उपायुक्त दर्जाचे अधिकारी, ८ राज्य राखीव पोलिस दल तुकड्या, ३ शीघ्र प्रतिसाद दल, १४ घातपातविरोधी पथके, १८ बीडीडीएस पथके, ६५० होमगार्ड, ४ हजार ७०० पोलिस अधिकारी व कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. संपूर्ण सोहळ्यावर नियंत्रण ठेवण्याकरिता फेस रिकग्नायजेशनकरिता २५१ ठिकाणी अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले आहेत. १९ ठिकाणी वाहनतळाच्या माध्यमातून २० हजार चारचाकी वाहनांची पार्किंग व्यवस्था करण्यात आली आहे.

## सर्वोच्च न्यायालयाचे दरवाजे आता २४ तास खुले!

### नागरिकांच्या हक्कांसाठी ऐतिहासिक पाऊल



**नवी दिल्ली :** आपत्कालीन परिस्थितीत फिर्यादी मध्यरात्रीही सर्वोच्च न्यायालयात येऊ शकतात. नागरिकांच्या हक्कांच्या रक्षणासाठी सर्वोच्च न्यायालयाचे दरवाजे आता चोवीस तास उघडे राहतील, अशी माहिती सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी गुड न्यूज दिली.

सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी स्पष्ट केले की, जर एखाद्या नागरिकाला कायदेशीर आणीबाणीचा सामना करावा लागला किंवा तपास यंत्रणांकडून अवेळी अटकेची धमकी दिली गेली, तर ती व्यक्ती आपल्या मूलभूत अधिकारांच्या आणि स्वातंत्र्याच्या संरक्षणासाठी मध्यरात्रीही घटनात्मक न्यायालयांकडे सुनावणीची मागणी करू शकेल. माझा प्रयत्न सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयांना जनतेची न्यायालये बनवण्याचा आहे, जेणेकरून कायदेशीर आणीबाणीच्या वेळी कोणत्याही क्षणी न्यायालयाशी संपर्क साधता येईल.

प्रलंबित प्रकरणांसाठी घटनापीठांची स्थापनासरन्यायाधीशांनी त्यांच्या कामाच्या प्राधान्यक्रमांबाबतही माहिती दिली. अनेक महत्त्वाच्या घटनात्मक मुद्द्यांशी संबंधित प्रलंबित याचिकांचा निकाल लावण्यासाठी जास्तीत जास्त घटनापीठांची स्थापना करणे ही त्यांची प्राथमिकता असेल. यामध्ये त्यांनी निवडणूक यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षणाच्या वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांचे उदाहरण दिले, जे प्रकरण बिहारमधून सुरू होऊन आता डझनभर राज्यांमध्ये प्रलंबित आहे.

## रामदास आठवलेंनी मुंबईत ३१ उमेदवार उतरवताच भाजप-शिंदे गटाचा मोठा निर्णय

**मुंबई :** मुंबईत भाजप आणि शिवसेना युतीत केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या रिपाइंची देखील एन्ट्री झाली आहे. भाजप आणि शिवसेना रिपाइंसाठी प्रत्येकी सहा–सहा जागा सोडणार असल्याची माहिती मिळत आहे. रामदास आठवले यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसआणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतल्यानंतर ही माहिती समोर येत आहे.



मुंबईमध्ये भाजप १३७ तर एकनाथ शिंदे यांची शिवसेना ९० जागांवर लढत आहे. दोन जागांवर एबी फॉर्मचा घोळ झाल्याने तिथे युतीचा एकही उमेदवार नाही. रामदास आठवले यांच्या रिपाइंची युतीत एन्ट्री झाल्यानंतर भाजपा १३१, शिवसेना ८४ आणि रिपाइं १२ असे जागा वाटपाचे गणित असणार आहे.

मुंबईत महायुतीत शिवसेना आणि भाजपा या दोन पक्षाचेच जागावाटप झाले होते. या जागा वाटपात रिपाइंला स्थान न दिल्याने रामदास आठवले नाराज झाले होते. नाराज रामदास आठवले यांनी वर्षा बंगल्यावर जात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. त्यानंतर ठाण्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची देखील भेट घेतली. या भेटीच्या पार्श्वभूमीवर दोन्ही पक्ष रिपाइंसाठी सहा–सहा जागा देणार असल्याचे आश्वासन देण्यात आल्याची माहिती रामदास आठवले यांनीच दिली आहे.

**उर्वरित जागा रिपाइं अपक्ष लढवणार**

रामदास आठवले यांच्या रिपाइं पक्षाने जवळपास ३९ उमेदवारी अर्ज मुंबईतून दाखल केलेले आहेत. त्यामुळे या १२ जागा जर रामदास आठवले यांच्या पक्षासाठी सुटल्या तर उर्वरित जागा रिपाइं अपक्ष म्हणून स्वबळावर लढवणार असल्याचे देखील समजते. आता नक्की या जागा वाटपाबाबत काय निर्णय होणार याबाबत उद्यापर्यंत स्पष्टता येणार आहे.

## भारतासह जगभरात २०२६ ची उत्साहात सुरुवात; जम्मू आणि काश्मीरमध्ये बर्फवृष्टीत आनंदोत्सव

**पुणे :** भारतासह जगभरात २०२६ वर्ष सुरू झाले. रात्री उशिरा दिल्लीतील इंडिया गेटवर शेकडो लोक जमले आणि घड्याळात १२ चे काऊंटडाऊन करत सेलिब्रेशन केले. जम्मू आणि काश्मीरमध्ये लोकांनी बर्फवृष्टीत २०२६ चे स्वागत केले. २०२६ ची सुरुवात करणाऱ्या पहिल्या देशांमध्ये न्यूझीलंडचा समावेश होता. घड्याळात १२ वाजताच ऑकलंडमधील २४० मीटर उंच स्काय टॉवरवर सुमारे ३५०० फटाके वाजवण्यात आले. स्काय टॉवर ही न्यूझीलंडची सर्वात उंच इमारत आहे. जगातील सर्वात पूर्वेकडील स्थान असल्याने, न्यूझीलंड प्रथम नवीन वर्ष साजरे करतो.




**सिडनी हार्बरवर पारंपारिक आतषबाजीचे प्रदर्शन**

जपान, चीन, सिंगापूर, युएई आणि इंग्लंडमध्ये नवीन वर्षाची संध्याकाळ आतषबाजीने साजरी करण्यात आली. नवीन वर्षाची सुरुवात जाहीर करण्यासाठी दक्षिण कोरियामध्ये मोठी घंटा वाजवण्यात आली. ऑस्ट्रेलियातील सिडनी हार्बरवर पारंपारिक आतषबाजीचे प्रदर्शन पाहण्यासाठी हजारो लोक जमले. दरम्यान, सात मिनिटांच्या आतषबाजीच्या प्रदर्शनाने मेलबर्नच्या आकाशात प्रकाश टाकला आणि शहर उजळून निघाले. जगभरातील वेगवेगळ्या टाइम झोनमुळे, २९ देश भारतापूर्वी नवीन वर्षाचे स्वागत करतात. यामध्ये किरिबाटी, सामोआ, टोंगा, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, पापुआ न्यू गिनी, म्यानमार, जपान, इंडोनेशिया, बांगलादेश, नेपाळ आणि इतर देशांचा समावेश आहे.

टाइम झोन म्हणजे पृथ्वीला वेळेनुसार विभागण्याचा एक मार्ग आहे. पृथ्वी दर २४ तासांनी ३६० अंश फिरते. म्हणजे १५ अंश प्रति तास, जे एका टाइम झोनचे अंतर मानले जाते. यामुळे जगभरात २४ समान अंतरावर वेळा तयार होतात. प्रत्येक टाइम झोन १५ अंश रेखांशाचा असतो आणि एकमेकांपासून सुमारे एक तासाने वेगळा असतो. म्हणूनच काही ठिकाणी सकाळ असते, तर काही ठिकाणी रात्र असते आणि काही ठिकाणी नवीन वर्ष लवकर येते आणि काही ठिकाणी नंतर येते. कोणत्या देशात तारीख कधी बदलते हे टाइम झोन ठरवतात.

**सायं दैनिक नवीन संध्या** हे वृत्तपत्र पृथ्वी इंटरप्रायजेस करीता मुद्रक – प्रकाशक सौ. संगीता सम्राट परदेशी यांनी पृथ्वी इंटरप्रायजेस, ११३ महात्मा फुले पेठ, पुणे ४११०४२ येथे छापून २०, शिवाजीनगर, पुणे–४११००५ येथे प्रसिद्ध केले.

संपादक – संगीता सम्राट परदेशी परदेशी

**प्रशासकीय कार्यालय** –११३, महात्मा फुले पेठ, पुणे –४११०४२

फोन नं. (०२०) २६३८१७०२. E-mail - tbssbs@gmail.com

* या वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वादविवाद पुणे न्यायालयीन कक्षेत. (कायदेशीर सल्लागार–ॲड. भागचंद चुनीलाल पालरेचा)

**पिंपरी कार्यालय**–फ्लॅट नं.६०२, बिल्डींग नं. एफ–२ यूनिट बिंग–२, जय गणेश साम्राज्य,नाशिक–पुणे रोड पांजरपोळ समोर, भोसरी,पिंपरी– ४११०३९

(दैनिक नवीन संध्या मध्ये छापलेल्या जाहिरातीच्या सत्यते बाबत मालक/प्रकाशक/संपादक जबावदार नाही.) स्थापना दिनांक ०१/१२/२०१०

## अग्रलेख....

## भारताचा नवा इतिहास

२०२६ मध्ये भारत जगातील चौथी अर्थव्यवस्था झाला आहे आणि त्याने जपानलाही मागे टाकले आहे. विशेष म्हणजे, भारताने हे यश टॅरिफच्या सावटात मिळवले. २०२६ च्या पहिल्या सहामाहीत आंतरराष्ट्रीय मुद्रा कोषाने जारी केलेल्या आकडेवारीनुसार, भारताचे सकल राष्ट्रीय उत्पादन ४.१८ ट्रिलियन डॉलर इतके झाले आहे.भारताने महागाई नियंत्रणात ठेवली आहे आणि बेरोजगारी कमी होत आहे. मोदी यांनी केलेल्या उपाययोजनांमुळे निर्यातीत सुधारणा झाली आणि भारताचा आयात–निर्यात समतोल सुधारला. भारत आता जगातील सर्वात जास्त वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांमध्ये सामील झाला. अगदी काही वर्षांपूर्वी भारत हा जगातील सर्वात मागास देशांपैकी एक होता आणि येथील जीडीपी साडेतीन टक्क्यांच्या वर कधी जात नव्हता. हा काळ तो होता जो देश डावे आणि मध्यममार्ग यांच्या कचाट्यात सापडला होता आणि इंदिरा गांधी यांच्या काळात तर सरकार डाव्यांच्या मगरमुठीत होते. पण ज्यावेळी मोदी सत्तेवर आले आणि तेव्हापासून भारताच्या अर्थव्यवस्थेने कात टाकण्यास सुरुवात केली आणि आज भारत जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनला आहे. मुडीजच्या अनुसार भारत २०२६ मध्ये ६.४ आणि २०२७ मध्ये ६.५ च्या गतीने वाढू शकेल, तर आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने भारताची गती २०२६ मध्ये ६.२ टक्के इतकी असेल असा अंदाज लावला आहे. अर्थात भारताची प्रगती सर्वत्र दिसते आणि रस्ते, सुविधा, लोकांचे जीवनमान कसे सुसह्य होईल हे मोदी सरकारने पाहिले. एकेकाळी जो देश हत्ती आणि सापांचा देश म्हणून ओळखला जात होता, त्या देशाने इतकी मोठी झेप घेणे ही निश्र्चितच कौतुकाची बाब आहे. याचे श्रेय निःसंशय मोदी यांना आहेच. पण भारताची जनता आणि येथील नागरिकांनाही आहे. काँग्रेसला हे मान्य नाही आणि त्यामुळे रशिद अल्वी यांनी ही बातमीच संपूर्ण चुकीची आणि निराधार आहे असे म्हटले आहे. काँग्रेसच्या काळात भारताने कधीही जीडीपी टक्क्यांच्या वर गेला नव्हता. आज तो ८ टक्क्यांच्या वर आहे आणि हे काँग्रेसला कसे पाहावणार. एवढ्यावरच भारताची प्रगती थांबणार नाही.

२०३० पर्यंत भारत आता जर्मनीला मागे टाकण्याचा अंदाज आहे. ही भारतासाठी सर्वात मोठी उपलब्धी आहे. अर्थात या आकडेवारीवरून भारतातील लोक सुखी आहेत की नाहीत याचा अंदाज येऊ शकत नाही, पण आकडेवारी ही एक प्रकारे मानदंड असते आणि त्यावरून असा निष्कर्ष काढता येतो, की लोक सुखी असू शकतात. २०३० पर्यंत भारताचा जीडीपी म्हणजे सकल देशांतर्गत उत्पादनाचा आकडा ७.३ ट्रिलियन डॉलरपर्यंत जाईल. आकडेवारी नीरस वाटू शकेल. पण भारताची प्रगती तर डोळ्यांना दिसते आहे आणि आज लोक सुखी जीवनमान जगत आहेत आणि त्यांच्याबरोबर महागाई नियंत्रणात आहे आणि बेरोजगारी कमी झाली आहे. अगदी पूर्वी म्हणजे १९५० ते १९८० च्या काळात भारताचा प्रगतीचा वेग मंद होता आणि तो एक टक्क्यांपेक्षा कमी होता. नंतरच्या दशकात गरिबी घटली आणि विकासदराने लक्षणीय झेप घेतली. काँग्रेस सरकारप्रमाणे गरिबी हटाव अशा घोषणा न देताही मोदी सरकारने गरिबी घटवली आणि रोजगारी वाढवली. तरुणांना रोजगार उपलब्ध करून दिले आणि तरीही चीनच्या तुलनेत भारताची कामगिरी कमीच राहिली, पण आता भारत जपानला मागे टाकून चौथ्या क्रमाकांची अर्थव्यवस्था बनला आहे आणि यापुढचे लक्ष्य आहे ते जर्मनीला मागे टाकण्याचे.गेल्या काही वर्षांत अनेक शहरे जी कधीही प्रतिनिधींचे गंतव्यस्थान नसते ती आता गंतव्यस्थान बनले आहे आणि याचे उदाहरण आहे उत्तर प्रदेश भारताची वृद्धी. साडेसहा टक्क्यांनी राहिली तर जगाची वृद्धी ही तीन टक्क्यांच्या आसपास राहिली.

## अनुज्ञप्ती चाचणीसाठी वाढविण्यात आला अपॉइंटमेंट कोटा

**पुणे :** प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे अंतर्गत नागरिकांच्या सोयीसाठी इन्स्टिटयूट ऑफ ड्रायव्हिंग ट्रेनिंग अँड रिसर्च, कासारवाडी तसेच आळंदी रोड कार्यालय, फुलेनगर येथे पक्क्या अनुज्ञप्तीच्या चाचणीसाठी ५ जानेवारी २०२६ पासून पुढील कालावधीसाठी अपॉइंटमेंट कोटा वाढविण्यात आला आहे. या अपॉइंटमेंट दररोज सकाळी ६ ते दुपारी ४ वाजेपर्यंत उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे यांच्याकडून कळविण्यात आले आहे.आळंदी रोड कार्यालय, फुलेनगर येथे केवळ दुचाकी संवर्गातील चाचण्या घेण्यात येणार असून, दुचाकी वगळता चारचाकी व इतर सर्व संवर्गातील चाचण्या इन्स्टिटयूट ऑफ ड्रायव्हिंग ट्रेनिंग अँड रिसर्च, कासारवाडी, पुणे येथे होणार आहेत. अनुज्ञप्ती चाचणीसाठी दररोज २०० चारचाकी व ३०० दुचाकी संवर्गासाठी अपॉइंटमेंट देण्यात येणार असून, ज्या अर्जदारांची शिकाऊ अनुज्ञप्ती पुढील सात दिवसांत संपत आहे, अशा अर्जदारांसाठी अतिरिक्त २५ अपॉइंटमेंट राखीव ठेवण्यात आल्या आहेत.वाहन अनुज्ञप्ती चाचणीसाठी अपॉइंटमेंट ही आगाऊ जास्तीत जास्त ३० दिवसांपर्यंतच आरक्षित करता येणार असल्याने सर्व अर्जदारांनी वाढीव कोटाचा लाभ घेऊन आपली अपॉइंटमेंट शक्य तितक्या लवकर आरक्षित करावी, असे आवाहन प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे यांच्याकडून करण्यात आले आहे.

## जिल्ह्यातील तीन आयुष आरोग्य संस्थांना राष्ट्रीय एनएबीएच मानांकन

**पुणे :** जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत असलेल्या राजुर (ता. जुन्नर ) धामारी (ता. शिरूर) जळगाव क. प. (ता. बारामती) या तीन आयुष्मान आरोग्य मंदिरांना (आयुष) राष्ट्रीय पातळीवरील एनएबीएच मानांकन प्राप्त झाले असून, ही जिल्ह्यासाठी अभिमानास्पद बाब ठरली आहे. एनएबीएच हे गुणवत्ता परिषदेअंतर्गत कार्यरत मंडळ असून, रुग्णालये व आरोग्य संस्थांना रुग्ण सुरक्षितता व सेवेच्या गुणवत्तेच्या कठोर मानदंडांनुसार मान्यता देते.

एनएबीएच समितीच्या तज्ज्ञांमार्फत आयुष्मान आरोग्य मंदिरांची सखोल तपासणी करण्यात आली होती. मानांकनासाठी आवश्यक सर्व निकष पूर्ण करण्यासाठी ग्रामपंचायतींच्या सहकार्याने विविध आरोग्य शिबिरे आयोजित करण्यात आली, आरोग्य केंद्रांना आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्यात



आले तसेच वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी NABH मार्गदर्शक सूचनांनुसार सर्व नोंदी अद्ययावत ठेवल्या. स्वच्छता व साफसफाईवर विशेष भर देण्यात आला असून, हर्बल गार्डन तयार करून परिसराचे सुशोभीकरणही करण्यात आले. यासोबतच ग्रामस्थांकडून अभिप्राय घेण्यात आला.

सर्व पात्रता निकषांची यशस्वी पूर्तता झाल्यानंतर या तीनही संस्थांना एनएबीएच मानांकन प्राप्त झाले आहे. या कार्यासाठी गजानन पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी, डॉ. रामचंद्र हंकारे, जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे शुभहस्ते डॉ. बालाजी लकडे जिल्हा आयुष अधिकारी तसेच तालुका आरोग्य अधिकारी यांच्या प्रमुख उपस्थित प्रदान करण्यात आला.

आयुष्यमान आरोग्य मंदिरांमार्फत आयुष अभियानांतर्गत विविध आजारांवर आयुर्वेद उपचार, आरोग्यदायी जीवनशैलीसाठी योग व प्राणायाम सत्रे, आयुर्वेदोक्त दिनचर्या व ऋतुचर्येबाबत मार्गदर्शन तसेच सामान्य आजारांवर उपयोगी आयुर्वेदिक वनस्पतींच्या वापराबाबत माहिती पुस्तिकांचे वाटप करण्यात येते.

विशेष म्हणजे, या तीनही संस्था पुणे जिल्ह्यात एनएबीएच मानांकन प्राप्त करणाऱ्या पहिल्या आयुष आरोग्य संस्था ठरल्या असून, जिल्ह्याच्या आरोग्य सेवेच्या गुणवत्तेत हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

## नववर्षानिमित्त लोणावळा परिसरात वाहतूक बदलाबाबत जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश जारी

**पुणे :** नववर्षानिमित्त लोणावळा परिसरात येणाऱ्या पर्यटकामुळे होणाऱ्या वाहतूक कोंडी सोडविण्यासोबत सुरक्षिततेच्यादृष्टीने पर्यटनस्थळ परिसरात ३० डिसेंबर २०२५ रोजी रात्री १२ वाजल्यापासून ते १ जानेवारी २०२६ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत वाहतुकीत बदल करण्याबाबत जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी जितेंद्र डूडी यांनी आदेश जारी केले आहेत.

पुणे मुंबई, कामशेतकडे येणाऱ्या वाहने पवनानगर बाजारपेठेत बंदी घालण्यात येत असून येळसे ग्रामपंचायत फाटा येथून डावीकडे–शिवली (विजय आडकर यांचे घरापासून उजवीकडे कोथुर्णे बाजुकडे) कोथुर्णे गाव येथून डावीकडे–कोथुणे,मळवंडी फाट्यापासून उजवीकडे ब्राम्हणोलीकडे–वारु फाट्यावरुन पुढे सरळ ब्राम्हणोली फाटा मार्गे जवन रोडवरुन फांगणे, ठाकुरसाई, खडक गेव्हंडे, जवण, चावसर, मोरवे, तुंग अशी वाहतूक वळविण्यात येत आहे. परंतु, पवना नगर, कालेगाव, आंबेगाव, शिदगाव, पाले, धामनधरा, दुधीवरे बाजुस जाणारी वाहने तसेच जड,अवजड वाहने सोडण्यात येतील.

येळसे ग्रामपंचायत फाटा येथून डावीकडे–शिवली (विजय आडकर यांचे घरापासून उजवीकडे कोथुर्णे बाजुकडे)–कोथुर्णे गाव येथून डावीकडे–कोथुर्णे, मळवंडी फाट्यापासून उजवीकडे ब्राम्हणोलीकडे–वारु फाट्यावरुन पुढे सरळ ब्राम्हणोली एकेरी वाहतुक करण्यात येत आहे.

मौजे ब्राम्हणोली, वारु, कोथुर्णे, शिवली येथील स्थानिक रहिवाशांना येळसे बाजुकडे येण्यास बंदी करण्यात आली असून, वारु फाटा–ब्राम्हणोली फाटा–पवना नदी पुल–कालेगाव फाटा–पवना बाजारपेठ मार्गे येळसे कामशेत असे जाता येईल. पवनानगर बाजारातपेठेत वाहतूक कोंडी होवू नये म्हणून जड,अवजड वाहनांना जाण्यास बंदी करण्यात येत आहे.

१ जानेवारी २०२६ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत तुंग, मोरवे, चवसर, जवन, खडक गेव्हडे, ठाकुरसाई, फांगणेकडून पवनानगर, कामशेतकडे जाणारी वाहने काले कॉलनी पवनानगरकडे जाण्यास मनाई करण्यात आली असून ब्राम्हणोली फाटा उजवीकडे–वारु फाटा सरळ–मळवंडी,कोथुर्णे फाट्यावरुन डावीकडे–कोथुर्णे गाव उजवीकडे–शिवली (विजय आडकर यांचे घरापासून डावीकडे येळसेबाजुकडे) येळसे ग्रामपंचायत फाटा मार्गे मुंबई पुणे, कामशेत कडे वळविण्यात येत आहे. परंतु, पवनानगर, कालेगाव, आंबेगाव, शिंदगाव, दुधीवरे बाजूस जाणारी वाहने तसेच जड, अवजड वाहनांना सोडण्यात येईल.

ब्राम्हणोलीफाटा उजवीकडे–शिवली (विजय आडकर यांच्या घरापासून डावीकडे येळसे बाजुकडे) येळसे ग्रामपंचायत फाटा अशी एकेरी वाहतूक करण्यात येत आहे.

वारु ब्राम्हणोली येथील स्थानिक रहिवाश्यांनी पवना नदी पूल–कालेफाटा–पवना बाजारपेठेत येण्यास बंदी करण्यात येत असून, वारु फाटा–मळवंडी, कोथुर्णे फाट्यावरुन डावीकडे कोथुर्णे गावातून पवनानगर बाजारपेठ अशी या पर्यायी मार्गे वळविण्यात येत आहे, नागरिकांनी पर्यायी मार्गाचा वापर करुन प्रशासनास सहकार्य करावे, असेही आदेश जारी केले आहे.

## थर्टीफर्स्टच्या सेलिब्रेशनसाठी पुण्यात वाहतुकीत मोठे बदल; महात्मा गांधी, फर्ग्युसन, जंगली महाराज रस्ता बंद

**पुणे :** नववर्षाचे स्वागत करण्यासाठी पुणे शहराच्या अनेक भागात मोठा जल्लोष साजरा केला जातो. सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी नववर्षाचे स्वागत करण्यासाठी लष्कर भागातील महात्मा गांधी रस्ता, तसेच फर्ग्युसन रस्ता, जंगली महाराज रस्त्यावर होणारी गर्दी विचारात घेऊन आज (बुधवारी ३१ डिसेंबर) सायंकाळी ५ वाजल्यानंतर लष्कर आणि डेक्कन जिमखाना भागात वाहतूक बदल करण्यात आले आहेत. मद्यप्राशन करुन वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध कारवाईचा इशारा वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त हिंमत जाधव यांनी दिला आहे.



न्यु इयर सेलेब्रेशनसाठी पुण्यात लष्कर आणि डेक्कन भागात वाहतुकीत बदल करण्यात आल्याचेही सांगण्यात आले आहे. रात्री बारापर्यंत शहरात येणाऱ्या जड वाहनांना शहरात येण्यास मनाई करण्यात आली आहे. त्याचबरोबर दारू पिऊन गाडी चालवणाऱ्यांवरती देखील कारवाई करण्यात येणार आहे.

**फर्ग्युसन रस्ता आणि जंगली महाराज रस्त्यावरील वाहतूकबदल पुढीलप्रमाणे:**

– कोथरूड आणि कर्वे रस्त्याकडून येणारी वाहतूक खंडुजीबाबा चौक येथे थांबविण्यात येणार आहे. या भागातील वाहतूक विधी महाविद्यालय रस्ता, प्रभात रस्ता, अलका चित्रपटगृहाकडे वळवण्यात येणार आहे.

– जंगली महाराज रस्त्यावर होणारी गर्दी विचारात घेऊन झाशीची राणी लक्ष्मीबाई चौकातून वाहतूक बंद करण्यात येणार आहे. या भागातील वाहतूक गोखले स्मारक चौक, उपरस्ते, पुणे महापालिका भवन, ओंकारेश्वर मंदिर, छत्रपती शिवाजी महाराज रस्तामार्गे वळविण्यात येणार आहे.

– वाय जंक्शनकडून महात्मा गांधी रस्त्याकडे येणारी वाहतूक १५ ऑगस्ट चौक येथे बंद करून ती कुरेशी मशीद आणि सुजाता मस्तानी चौकाकडे वळविण्यात येणार आहे. इस्कॉन मंदिराकडून डॉ. लष्कर भागातील महात्मा गांधी रस्ता परिसरात सायंकाळी पाचनंतर वाहनांना प्रवेश बंद करण्यात येणार आहे.

– फर्ग्युसन रस्त्यावरील गोखले स्मारक चौक ते फर्ग्युसन महाविद्यालय प्रवेशद्वारापर्यंत वाहनांना प्रवेश बंद करण्यात येणार आहे. पहाटे पाचपर्यंत वाहनांना बंदी राहणार आहे.

– बाबासाहेब आंबेडकर रस्ता, तसेच अरोरा टॉवर्सकडे जाणारी वाहतूक बंद ठेवण्यात येणार आहे. व्होल्गा चौकातून महंमद रफी चौकाकडे जाणारी वाहतूक बंद ठेवण्यात येणार आहे. या भागातील वाहतूक ईस्टस्ट्रीटवरून इंदिरा गांधी चौकाकडे वळविण्यात येणार आहे.

– इंदिरा गांधी चौकातून महावीर चौकाकडे जाणारी वाहतूक बंद ठेवण्यात येणार आहे. या भागातील वाहतूक लष्कर पोलीस ठाण्याकडे वळविण्यात येणार आहे.सरबतवाला चौकातून महावी चौकाकडे जाणारी वाहतूक करण्यात येणार आहे.

**महात्मा गांधी, जंगली महाराज रस्ता राहणार बंद**

लष्कर भागातील महात्मा गांधी रस्ता परिसरात बुधवारी (३१ डिसेंबर) सायंकाळी पाचनंतर वाहनांना प्रवेश बंद करण्यात येणार आहे. महात्मा गांधी रस्त्यावरील १५ ऑगस्ट चौक ते अरोरा टॉवर्स चौकदरम्यान वाहनांना प्रवेश बंद करण्यात येणार आहे. फर्ग्युसन रस्त्यावरील गोखले स्मारक चौक ते फर्ग्युसन महाविद्यालय प्रवेशद्वारापर्यंत वाहनांना प्रवेश बंद करण्यात येणार आहे. पहाटे पाचपर्यंत वाहनांना बंदी राहणार आहे.

# विजयस्तंभ अभिवादन सोहळ्यासाठी प्रशासन सज्ज : जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी

**पुणे :** पेरणे फाटा येथे १ जानेवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेला विजयस्तंभ अभिवादन सोहळा शांतता आणि उत्साहात साजरा व्हावा यासाठी आवश्यक सर्व सुविधा प्रशासनातर्फे उपलब्ध करून देण्याची पूर्वतयारी करण्यात आली असून सोहळ्याच्या नियोजनासाठी प्रशासन सज्ज आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले.

श्री. डुडी म्हणाले, दरवर्षी साजरा होणारा विजयस्तंभ अभिवादन सोहळा हा महत्वाचा कार्यक्रम आहे. यावर्षी अधिक अनुयायी येण्याचे गृहीत धरून सूक्ष्म नियोजन करण्यात आले आहे. सर्व अनुयायांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये, म्हणून प्रशासन योग्य ती दक्षता घेत आहे. नियोजन करताना विविध संघटना आणि नागरिकांच्या सूचनाही लक्षात घेण्या आल्या आहेत. सोहळा शांतता, संयम आणि त्याच उंचीने साजरा करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहनही श्री. डुडी यांनी केले.

जिल्हापरिषदेच्यावतीने २३ आरोग्य केंद्र, ४३ रुग्णवाहिका, १८ खासगी रुग्णालयातील २८६ खाटा आरक्षित, १५५ प्रशिक्षित मनुष्यबळ, उपहारगृह व टँकरकरिता ३३ तपासणी पथके, ८० घंटागाडी, शुद्ध पाण्याची व्यवस्थेसाठी




१५० टँकर्स, पाणी भरण्याच्या ठिकाणी २०० कर्मचारी नियुक्त, २ हजार ८०० शौचालय, २६५ सफाई कामगार, २६० पर्यवेक्षण अधिकारी व कर्मचारी, ९ हिरकणी कक्ष आदी सुविधा करण्यात आल्या आहेत. पेरणे, कोरेगाव भिमा ते पिंपळे जगताप रस्ता, ढरंगेवस्ती, कोरेगाव भिमा ते वाडेवस्ती आदी ठिकाणी रस्ते दुरुस्ती, पिण्याच्या पाणी भरण्याचे ठिकाणी मुरुम भरण्यासह शोषखड्डा करण्यात आले आहेत.

पुणे शहर पोलीस आयुक्तालयाच्यावतीने कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी १ महानिरीक्षक, ३ पोलीस उपमहानिरीक्षक, २० पोलीस उपायुक्त दर्जाचे अधिकारी, ८ राज्य राखीव पो-लीस दल तुकड्या, ३ शिघ्र प्रतिसाद दल, १४ घातपात विरोधी पथक, १८ बीडीडीएस पथके, ६५० होमगार्ड, ४ हजार ७०० पोलीस अधिकारी व कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. संपूर्ण सोहळ्यावर नियंत्रण ठेवण्याकरिता फेस रिकगनायजेशनकरिता २५१ ठिकाणी अत्याधुनिक सीसीटिव्ही कॅमेरे लावण्यात आले आहेत. १९ ठिकाणी वाहनतळाच्या माध्यमातून २० हजार चारचाकी वाहनाची पार्किंग व्यवस्था करण्यात आली आहे.

पिंपरी-चिंचवड शहर पोलीस आयुक्तालयाच्यावतीने ४ पोलीस उपायुक्त, ८ सहायक पोलीस उपायुक्त, ४५ पोलीस निरीक्षक, सहायक पोलीस निरीक्षक व पोलीस उपनिरीक्षक एकूण १७१, १ हजार ३२५ अंमलदार, वार्डन व होमगार्ड एकूण ६५०, २ सर्व्हेलन्स व्हॅन, ३ आरसीपी आणि १ शिघ्र प्रतिसाद दलातील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक ग्रामीण कार्यालयाच्यावीने कायदा व सुवव्यस्थेच्यादृष्टीने शिरुर तालुक्यातील वढू बु. येथील छत्रपती शंभाजी महाराज व गोविंद गोपाळ महाराज यांच्या समाधीस्थळी अनुयायी दर्शनासाठी येतात. यादृष्टीने गर्दीवर नियंत्रण आणि कायदा व सुव्यवस्था राखण्याकरिता कोरेगाव भिमा, वढु. बु. व शिक्रापूर पोलीस स्टेशनच्या हद्दीत बंदोबस्ताकरिता ३३ वरिष्ठ पोलिस अधिकारी, ३३२ इतर पोलिस अधिकारी, ३ हजार १० पोलिस अंमलदार, १ हजार ५०० होमगार्ड, ४ राज्य राखीव पोलीस दल तुकड्या, १० स्ट्रायकींग फोर्स, ४ आरसीपी पथक, २ शिघ्र प्रतिसाद दल आणि ७ बीडीडीएस पथके नेमण्यात आली आहेत.

सुरक्षेच्या व निगराणीच्या दृष्टीने पोलिस विभागामार्फत सीसीटीव्ही कॅमेरे, ड्रोन कॅमेरे तसेच ध्वनीक्षेपण यंत्रणा आदी सुविधा करण्यात आली आहे. वाहनतळाचे ठिकाण, पिकअप व ड्रॉपचे ठिकाण, वॉच टॉवर्स, पोलीस मदत केंद्र, वज्र मोबाईल आदी व्यवस्था करण्यात आल्या आहेत. आपत्कालीन परिस्थितीसाठी अग्निशमन दल, रुग्णवाहिका तसेच राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाची पथके आदी यंत्रणा सुसज्ज ठेवण्यात आल्या आहेत.

अहिल्यानगरमार्गे येणाऱ्या अनुयायांच्या वाहनांकरिता वक्फ बोर्ड तसेच मुंबई-नाशिक रोडकडून येणाऱ्या अनुयायांकरीता टोरंटो गॅस वाहनतळ आणि जातेगाव खु. चाकणरोड येथे, तर पोलीस व प्रशासन यांच्या वाहनांकरीता तोरणा वाहनतळ येथे व्यवस्था करण्यात आली आहे. कोरेगाव-भिमा येथून वढू बु. याठिकाणी जाणाऱ्या अनुयायांकरीता इनामदार पार्किंग, कोरेगाव भिमा येथून पीएमपीएमएलची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच पोलीस दलाच्यावतीने वाहतूक वळविण्याबाबत आदेश पारित केले आहेत.

पीएमपीएलच्यावतीने ३१ डिसेंबर २०२५ रोजी ३७५, तर १ जानेवारी २०२६ रोजी १ हजार २६० पीएमपीएल बसेसचे नियोजन केले आहे. प्रत्येक बसवर दोन कर्मचारी, राखीव चालक, तांत्रिक कर्मचारी मिळून अशी ४ हजार २०० कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे.

बार्टीच्यावतीने एकूण ३१० बुक स्टॉलची व्यवस्था करण्यात आली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्यावतीने विजयस्तंभाला फुलांची सजावट, विद्युत रोषणाई, परिसर डागडुजी, पत्रकार कक्ष, मंडप, परिसर सुशोभिकरण आदी व्यवस्था करण्यात आली आहे.

सार्वजनिक बांधकाम विद्युत विभाग, महावितरणने परिसरात विद्युत पुरवठा करण्यात आला आहे.

# भाजप- एकनाथ शिंदेंना मोठे धक्के, पिंपरीत तब्बल ५ उमेदवारांचे एबी फॉर्म बाद




**पुणे :** महापालिका निवडणुकांसाठी अर्ज छाननी प्रक्रियेला आजपासून सुरुवात झाली असून अनेक ठिकाणी आक्षेप घेतल्याने उमेदवारांचे अर्ज बाद ठरत आहेत. मुंबईतील दोन प्रभागात भाजप उमेदवारांचे अर्ज बाद झाल्यानंतर आता पिंपरी चिंचवडमध्येही भाजपच्या तीन उमेदवारांना फटका बसला आहे. पिंपरी चिंचवडमध्ये भाजप आणि शिंदेंच्या शिवसेनेला मोठा धक्का बसला आहे. येथील प्रभाग २४ मधील भाजपच्या तीन जागेवरील आणि शिंदेंच्या शिवसेना पक्षातील दोन उमेदवारांचे एबी फॉर्म बाद ठरविण्यात आले आहेत. त्यामुळे, आता येथील उमेदवारांना अपक्ष निवडणूक लढवावी लागणार आहे.

शिवसेना खासदार श्रीरंग बारणेंच्या प्रभागात युतीत स्वबळावर लढणाऱ्या दोन्ही पक्षांना हा मोठा फटका बसलाय. अर्ज भरण्याची मुदत संपल्यानंतर हे पाचही एबी फॉर्म जमा झाले होते. त्यावर विरोधी उमेदवारांनी आक्षेप घेतला होता. त्यामुळे आजच्या छाननीमध्ये एबी फॉर्म बाद ठरविण्यात आले आहेत. त्यामुळे, पिंपरी चिंचवड महापालिकेत भाजप आणि शिवसेना शिंदे गटाला मोठा फटका बसला आहे. आता, या जागेवर पाचही उमेदवारांना अपक्ष म्हणून निवडणूक लढवावी लागणार आहे. आता हे पाहता प्रभाग २४ मध्ये कमळ चिन्हाचा फक्त एकचं उमेदवार असेल तर शिंदे शिवसेनेचे दोन उमेदवार धनुष्यबाण या चिन्हावर लढतील. त्यामुळे, येथील भाजप आणि शिवसेना उमेदवारांसाठी स्वतंत्र प्रचार यंत्रणा राबवावी लागणार असून पक्षाच्या उमेदवारांची चांगलीच गोची झाल्याचं पाहायला मिळत आहे.

# जन्मजात यकृत (लिव्हर) आजाराने त्रस्त मुलांसाठी वेळेवर होणारे ट्रान्सप्लांट कसे बदलू शकते संपूर्ण आयुष्य

**पुणे :** जन्मजात यकृत आजाराने त्रस्त मुलांमध्ये वारंवार काविळ, फिक्कट किंवा राखाडी रंगाची विष्ठा, पोटाचा आकार असामान्यपणे वाढणे किंवा वजन योग्यरित्या न वाढणे अशी लक्षणे दिसून येतात. या रोगांचे सर्वात सामान्य कारण "बिलियरी एट्रेसिया" (Biliary Atresia) हे असते, ज्यामध्ये पित्त बाहेर वाहून नेणाऱ्या नलिका एकतर विकसित होत नाहीत किंवा बंद होतात. याशिवाय पित्त प्रवाहाशी संबंधित इतर समस्या आणि काही जेनेटिक मेटाबॉलिक लिव्हर डिसीजेस देखील यासाठी जबाबदार असू शकतात, ज्यामध्ये एन्झाईम्सच्या कमतरतेमुळे यकृताचे गंभीर नुकसान होते.

हे आजार केवळ मुलाच्या शारीरिक वाढीत अडथळा आणत नाहीत, तर त्यांच्या मानसिक विकासावरही विपरीत परिणाम करतात. त्यामुळे अशा मुलांना तात्काळ आणि विशेष पीडियाट्रिक लिव्हर केअरची आवश्यकता असते. योग्य वेळी तज्ज्ञांकडून उपचार मिळाल्यास मुले केवळ आजारातून सावरत नाहीत, तर आपल्या वयाच्या इतर मुलांप्रमाणे आवश्यक "ग्रोथ माईलस्टोन्स"




देखील गाठू शकतात.

नानावटी मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, मुंबई येथील इन्स्टिट्यूट ऑफ लिव्हर, इंटेस्टाईन अँड पॅनक्रियास सायन्सेसमधील पीडियाट्रिक हेपेटोलॉजीचे असोसिएट डायरेक्टर, **डॉ. ललित वर्मा** यांनी सांगितले: जन्मजात लिव्हरचा आजार मुलाच्या वाढीवर अनेक स्तरांवर परिणाम करतो. जेव्हा पित्त प्रवाह (Cholestasis) विस्कळीत होतो, तेव्हा आतडे चरबी (Fat) आणि चरबीमध्ये विरघळणारी जीवनसत्त्वे- जसे की A, D, E आणि K-योग्यरित्या शोषू शकत नाहीत. यामुळे वजन वाढण्यास अडचण, उंची खुंटणे आणि हाडे कमकुवत होणे यांसारख्या समस्या उद्भवतात. पोटात द्रव (Fluid) साठल्यामुळे आणि प्लीहा (Spleen) वाढल्यामुळे मुलाला सतत जडपणा जाणवतो.

सतत खाज सुटणे आणि थकवा यामुळे त्यांची झोप आणि खेळण्यावरही परिणाम होतो, ज्यामुळे त्यांचा सर्वांगीण विकास थांबतो. याव्यतिरिक्त, ग्रस्त यकृत शरीरातील विषारी घटक (Toxins) बाहेर टाकू शकत नाही, ज्यामुळे मेंदूच्या विकासावर परिणाम होतो आणि बसणे, चालणे यांसारख्या मोटर स्किल्ससह बोलण्याच्या क्षमतेतही विलंब होऊ शकतो.डॉ. वर्मा यांनी पुढे सांगितले की, वेळेवर तज्ज्ञांची देखभाल, योग्य आहार योजना, संसर्ग नियंत्रण आणि आवश्यक असल्यास शस्त्रक्रियेमुळे मुलाची उंची, हाडांचे आरोग्य, शिकण्याची क्षमता आणि वर्तणुकीत स्पष्ट सुधारणा दिसून येते.

**ट्रान्सप्लांटनंतर ३कॅच-अप ग्रोथ**

ट्रान्सप्लांटनंतर बहुतांश पीडियाट्रिक रुग्णांमध्ये "कॅच-अप ग्रोथ" दिसून येते. याचा अर्थ असा की, सुमारे दोनवर्षांच्या आत ते वेगाने वाढून आपल्या विकासाची उरलेली उद्दिष्टे पूर्ण करतात.

# श्री रोटमलनाथ मंदिरात मुलगा झाल्यानंतर आईचे मुंडन या अनिष्ट प्रथेविरोधात जनजागृतीची गरज-राज्य महिला आयोग

**पुणे :** दौंड तालुक्यात असलेल्या श्री रोटमलनाथ मंदिरात मुलगा झाल्यानंतर आईचे मुंडन करण्याच्या प्रथेविरोधात व्यापक जनजागृती करणे व अशा अनिष्ट प्रथांचे समर्थन करणाऱ्या विरोधात अंधश्रद्धा निर्मूलन कायद्याअंतर्गत कारवाई करण्याबाबत महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या बैठकीत चर्चा झाली.

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या पुणे येथील विभागीय कार्यालयात आयोगाच्या सदस्य सचिव नंदिनी आवडे यांच्या अध्यक्षतेखाली रोटमलनाथ मंदिरात मातांचे मुंडन करण्याच्या प्रथेबाबत बैठक झाली. यावेळी महिला व बाल विकास पुणे विभागीय उपआयुक्त संजय माने, यवत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नारायण देशमुख, परिविक्षा अधिकारी बी. बी. घालमे, जिल्हा संरक्षण अधिकारी ए.सी. मोजर, समुपदेशक ए. जी. शिरसाठ, सरीता वाडेकर, भरोसा सेलच्या पोलीस उपनिरीक्षक अनुराधा पाटील आदी उपस्थित होते.

राज्य महिला आयोग कार्यालयाकडे स्वयंसेवी संस्थेने श्री.रोटमलनाथ मंदिरात मुलगा झाल्यानंतर आईचे मुंडन करण्यात येते,याबाबत तक्रार केली आहे. या प्रथेद्वारे महिलांच्या आत्मसन्मानास तडा जात असून त्यासाठी त्याच्यावर दबाव टाकण्यात येत असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रथेबाबत प्रसार माध्यमावर प्राप्त झालेल्या चित्रफितीचे अवलोकन केले असता मुलासोबत आईचे मुंडन केल्याबाबतच्या तक्रारीत तथ्य असल्याचे दिसून आले. त्यामुळे अंधश्रद्धा निर्मूलन कायदा अंतर्गत याप्रथेचे समर्थन करणाऱ्या विरोधात कारवाई करणे क्रमप्राप्त आहे.

बैठकीत चर्चेदरम्यान या अनिष्ट प्रथेबाबत स्वयंसेवी संस्था, समुपदेशक व पोलिस प्रशासन यांच्या सहकार्याने गावात जनजागृती करण्यात यावी असे ठरले.या बैठकीत पोलीस निरीक्षक नारायण देशमुख यांनी समन्वय आणि सकारात्मक दृष्टीकोनाबाबत उदाहरण दिले. दौंड तालुक्यातील मौजे कुसेगाव येथील यात्रेच्या दुसऱ्या दिवशी होणाऱ्या वाहतूक कोंडीच्या अनुषंगाने पोलीस प्रशासनामार्फत चर्चा करून योग्य नियोजन करण्यात आले आहेत. यावर्षी गावकऱ्यांकडून पशुहत्याबंदी जाहीर करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. तसेच दौंड तालुक्यातील मौजे रोटी येथील मुंडन प्रथेच्या अनुषंगाने पीडित महिलांच्या तक्रारीबाबत शासन आदेशानुसार व कायद्याच्या तरतुदीनुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असेही श्री. देशमुख म्हणाले. आयोगाकडे प्राप्त तक्रार आणि या प्रथेबाबत सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी आयोगाच्या सदस्य सचिव नंदिनी आवडे यांचे अध्यक्षतेखाली दि.२ जानेवारी २०२६ रोजी ग्रामपंचायत मौजे रोटीयेथे बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीस तहसीलदार, गटविकास अधिकारी, यवतचे पोलिस निरीक्षक, बाल विकास प्रकल्प अधिकारी (ग्रामीण), तालुका संरक्षण अधिकारी, मौजे रोटी येथील सरपंच, ग्रामसेवक, मंडळ अधिकारी, तलाठी, पोलीस पाटील, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर आदीनी माहितीसह उपस्थित राहण्याचे आयोगाने निर्देश दिले आहेत, असे आयोगाच्या सदस्य सचिव नंदिनी आवडे यांनी प्रसिद्धीपत्रकान्वये कळविले आहे.

# लोकशाही सक्षमीकरणासाठी प्रत्येक निवडणुकीत मतदान करण्याचा नववर्षात संकल्प करा : आयुक्त श्रावण हर्डीकर



**पिंपरी :** भारतीय संविधानाने नागरिकांना दिलेला मतदानाचा हक्क केवळ अधिकार नसून तो प्रत्येक जागरूक नागरिकाची जबाबदारी आहे. प्रत्येक निवडणुकीत मतदान केल्याने लोकशाही अधिक सक्षम होते. २०२६ हे नववर्ष आता सुरू होत आहे. या नववर्षात प्रत्येक निवडणुकीत नियमितपणे मतदान करण्याचा ठाम संकल्प करून याची सुरुवात येत्या १५ जानेवारी रोजी होणाऱ्या पिंपरी चिंचवड महापालिका सार्वत्रिक निवडणुकीतून करा, असे आवाहन आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांनी केले. नागरिकांचा सक्रिय सहभागच सक्षम, पारदर्शक आणि उत्तरदायी लोकशाही घडवू शकतो, असेही त्यांनी नमूद केले.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी राबविण्यात येत असलेल्या स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदान जनजागृती उपक्रम शहरातील विविध भागांत राबवण्यात येत आहेत. या अंतर्गत आज महापालिकेच्या समाज विकास विभागाने आकुर्डी रेल्वे स्टेशन परिसरात उभारलेल्या 'सखी आंगण' येथे मतदान जनजागृती उपक्रम घेण्यात आला,त्यावेळी आयुक्त हर्डीकर बोलत होते.

महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपायुक्त अण्णा बोदडे, उपायुक्त ममता शिंदे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह महिला बचत गटांतील महिला यावेळी उपस्थित होत्या.

आयुक्त हर्डीकर म्हणाले, नवीन वर्षाचे आगमन आपल्या आयुष्यात नव्या आशा, संधी आणि सकारात्मक बदल घेऊन येत आहे. या पार्श्वभूमीवर 'सखी आंगण'सारखा उपक्रम तुमच्या आयुष्याला निश्चितच कलाटणी देणारा ठरेल, असा मला ठाम विश्वास आहे. ही वास्तू केवळ एक प्रकल्प नसून तुमच्या सर्वांच्या आयुष्यात स्थैर्य, स्वावलंबन आणि भरभराट घडवून आणण्याचे माध्यम ठरेल. येत्या काळात येथे मिळणाऱ्या संधींचा पुरेपूर लाभ घेऊन प्रत्येकाने स्वत:चा आणि आपल्या कुटुंबाचा विकास साधावा. तसेच नवीन वर्षातच, १५ जानेवारी रोजी पिंपरी चिंचवड महापालिकेची निवडणूक होत आहे. या निवडणुकीत सर्व पात्र मतदारांनी आवर्जून मतदान करून लोकशाहीच्या या महत्त्वपूर्ण प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा. आपल्या कुटुंबातील प्रत्येक मतदाराला,मित्रपरिवाराला देखील मतदानासाठी प्रोत्साहित करावे. कोणाच्याही दबावाखाली न येता, स्वेच्छेने आणि निर्भयपणे मतदान करणे हीच सक्षम आणि बळकट लोकशाहीची खरी ओळख आहे, असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी मतदानाचे महत्त्व नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी मतदान जनजागृतीबाबत पथनाट्य सादरीकरण करण्यात आले. या पथनाट्याच्या माध्यमातून प्रत्येक नागरिकाने प्रत्येक निवडणुकीत मतदान करण्याचा संदेश देण्यात आला. माणिक खटींग, निलम वाघमारे, अनिकेत शिंदे, शिवप्रसाद पासलकर, भरत साळुंखे या कलाकारांनी या नाटकाचे सादरीकरण केले. तसेच फ्लॅश मॉबचे सादरीकरण करून मतदानाबाबत जनजागृती करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.

**आयुक्तांनी महिला बचत गटांकडून तयार केलेल्या खाद्यपदार्थांची केली खरेदी**

आकुर्डी येथील सखी आंगण खाद्यपदार्थ केंद्रात एकूण ४९ गाळे कार्यरत असून, या ठिकाणी महिला बचत गटांमार्फत विविध खाद्यपदार्थांचा व्यवसाय केला जात आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी या सर्व गाळ्यांना भेट देत महिला बचत गटांकडून सुरू असलेल्या व्यवसायाची सविस्तर माहिती घेतली. यावेळी त्यांनी विविध खाद्यपदार्थांची खरेदी करून त्यांचा आस्वाद घेत महिलांच्या उपक्रमांचे कौतुक देखील केले.

**मतदानाची शपथ**

आम्ही, भारताचे नागरिक, लोकशाहीवर निष्ठा ठेवून याद्वारे प्रतिज्ञा करतो की, आपल्या देशाच्या लोकशाही परंपरांचे जतन करू आणि मुक्त, नि:पक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातील निवडणुकांचे पावित्र्य राखू. तसेच प्रत्येक निवडणुकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात, समाज, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करू, अशी मतदानाची शपथ यावेळी उपस्थितांना देण्यात आली.

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक निरीक्षक म्हणून निरंजन कुमार सुधांशू यांची तर निवडणूक निरीक्षक म्हणून सरिता नरके यांची नियुक्ती



**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ साठी राज्य निवडणूक आयोगाकडून मुख्य निवडणूक निरीक्षक म्हणून पुण्यातील यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन अकादमी (यशदा) चे संचालक निरंजन कुमार सुधांशू यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर निवडणूक निरीक्षक म्हणून विभागीय आयुक्त, पुणे यांच्याकडून सांगली जिल्ह्याच्या जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या अध्यक्षा सरिता नरके यांची नियुक्ती करण्यात आली असल्याची माहिती निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांनी दिली आहे.

मुख्य निवडणूक निरीक्षक निरंजन कुमार सुधांशू यांच्या संपर्कासाठी त्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक ९०९६०९०७५८ हा असून निवडणूक निरीक्षक सरिता नरके यांचा भ्रमणध्वनी क्रमांक ९०९६०९०७५७ हा आहे. तसेच मुख्य निवडणूक निरीक्षक यांचा अधिकृत ई-मेल आयडी observer.pcmcpcm-cindia.gov.in असा आहे.

# प्रियंका बर्वे व सारंग कुलकर्णी यांच्या हस्ते एमआयटी सांस्कृतिक संध्याचे उद्‌घाटन

**पुणे :** भारतीय संस्कृती ही संस्कार देणारी आहे. येथील सांस्कृतिक संध्या ही संगीताच्या साधनेतून शांत रसाची अनुभूती देऊन ईश्वरीय दर्शन घडते. तरूण पिढीला भारतीय संस्कृतीचा विसर पडत असतांना त्यांच्यात ही संस्कृती रुजविण्यासाठी संगीत महत्वाची भूमिका बजावते. नव वर्षात प्रवेश करतांना आपण संस्कृतीचे जतन करत आहोत हे अद्विितीय व आनंदाचा क्षण आहे. असे विचार विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणेचे संस्थापक अध्यक्ष व एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड

विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे भारततर्फे लोणी काळभोर येथील विश्वराज बंधारा, विश्वशांती गुरूकुल, राजबाग येथे आयोजित केलेल्या दोन दिवसीय एमआयटी सांस्कृतिक संध्या संगीत महोत्सावाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.



यावेळी प्रियंका बर्वे व सारंग कुलकर्णी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच डॉ. मंगेश तु. कराड, विश्र्वशांती संगीत कला अकादमीच्या कार्यकारी संचालिका सौ. ज्योती कराड-ढाकणे, पं. उद्धवबापू आपेगावकर, विश्वशांती कला अकादमीचे महासचिव आदिनाथ मंगेशकर, दूरदर्शनचे माजी संचालक डॉ. मुकेश शर्मा आणि प्रसिद्ध गप्पाष्टककार डॉ. संजय उपाध्ये उपस्थित होते.

विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले, संगीत साधना ही सर्व शास्त्रांमध्ये सर्वोच्च आहे. यात नाद व ताल आहे. ही संगीत साधना नसून संस्कृती आहे. भारतरत्न लता दीदी यांनी विश्वशांती संगीत कला अकादमीचे अध्यक्ष पद भूषविले होते हा आमच्यासाठी गौरवाचा क्षण होता.

प्रियंका बर्वे म्हणाल्या, गाण्यावर व कलेवर प्रेम करणार्यांसाठी डॉ. कराड यांनी खूप मोठे कार्य केले आहे. सांस्कृति संध्या सारखे कार्यक्रमाचे आयोजन करून येथे गायन, वादन आणि नृत्यांचा संगम घडवून आणत आहेत. वर्ष २०२५च्या शेवटाकडे जातांना आपण क्लासिकलने नव वर्षाचे स्वागत करतो हे खूप सुंदर आहे.

सारंग कुलकर्णी म्हणाले, सांस्कृतिक संध्या ही संकल्पनाच युनिक आहे. एमआयटीने नव वर्षाची सुरूवात भारतीय परंपरा व संस्कृतीने करण्याचा जो पायंडा घातला आहे त्यामुळे संपूर्ण जगभरात याची नक्कीच वेगळी ओळख निर्माण होईल. या संगीत महोत्वसाची सुरूवात सुप्रसिद्ध शहनाई वादक तुकाराम दैठणकर यांच्या सनई वादनाने झाली. उद्घाटनानंतर अदिती रिसवडकर यांनी कथ्थक नृत्याचे सादरीकरण केले. त्यानंतर ज्येष्ठ व्हायोलियन वादक सारंग कुलकर्णी यांचे व्हायोलियन वादनाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

# सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने सुरु असलेल्या कामकाजाचा घेतला आढावा

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या निवडणूक संबंधित तयारीचा आढावा घेण्यासाठी मुख्य निवडणूक निरीक्षक निरंजन सुधांशू यांनी आज महापालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनास भेट दिली तसेच विविध कक्षांची पाहणी केली. या पाहणीदरम्यान महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांनी मुख्य निवडणूक निरीक्षक यांना अभिरक्षा कक्ष, प्रस्तावित मतमोजणी कक्ष, आचारसंहिता कक्ष तसेच नामनिर्देशन प्रक्रियेची माहिती दिली. यावेळी प्रत्येक कक्षामध्ये सुरू असलेले कामकाज, कार्यपद्धती, नोंदवही व्यवस्थापन व प्रशासकीय रचना याची सविस्तर माहिती मुख्य निवडणूक निरीक्षक यांनी घेतली.

यावेळी महापालिका अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, मुख्य अभियंता तथा निवडणूक निरीक्षक यांचे समन्वय अधिकारी संजय कुलकर्णी, मुख्य अभियंता तथा ईव्हीएम कक्ष प्रमुख प्रमोद ओंभासे, निवडणूक विभागाचे उप आयुक्त सचिन पवार, महापालिका उप आयुक्त अण्णा बोदडे, विशेष अधिकारी तथा प्रसार माध्यम व संनियंत्रण समिती सदस्य-सचिव किरण गायकवाड, कार्यकारी अभियंता लक्ष्मीकांत कोल्हे, हरविंदरसिंह बन्सल, मनोहर जावरानी तसेच विविध कक्षांचे प्रमुख आणि कर्मचारी उपस्थित होते.



आचारसंहिता कक्षाच्या पाहणीदरम्यान कक्षामार्फत प्राप्त होणाऱ्या तक्रारी, त्यांची नोंद, वर्गीकरण व त्यासंबंधी ठेवण्यात येणारी माहिती, तसेच कक्षामधील प्रशासकीय कामकाजाची सध्याची स्थिती याबाबत मुख्य निवडणूक निरीक्षक यांना माहिती देण्यात आली.

याशिवाय, प्रसार माध्यम व संनियंत्रण समिती कार्यालयाची पाहणी करताना माध्यमांमधून प्रसिद्ध होणाऱ्या निवडणूकसंबंधित बातम्या, जाहिराती, सोशल मीडिया तसेच डिजिटल माध्यमांवरील मजकुराचे निरीक्षण व नोंद कशा पद्धतीने केली जाते, याची माहिती सादर करण्यात आली.

चिंचवड येथील ऑटो क्लस्टर सभागृह येथे अभिरक्षा कक्षाची पाहणी करताना ईव्हीएम यंत्रांची साठवणूक व्यवस्था, सीलबंद स्थिती, सुरक्षा व्यवस्था, प्रवेश नियंत्रण प्रणाली तसेच संबंधित कागदपत्रांची पाहणी करण्यात आली.

मतदानासाठी वापरण्यात येणारी ईव्हीएम यंत्रे व निवडणूक साहित्य राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार विविध जिल्ह्यातून पिंपरी येथे आणण्यात आले असून, ती अभिरक्षा कक्षामध्ये सुरक्षितरीत्या ठेवण्यात आल्याची माहिती आयुक्तांनी दिली. याशिवाय त्यांनी प्रस्तावित मतमोजणी कक्षाची पाहणी केली. यावेळी मतमोजणीसाठी प्रस्तावित जागा, कक्षांची मांडणी, प्रवेश व निर्गमन व्यवस्था, तसेच मतमोजणी प्रक्रियेसाठी आवश्यक असलेल्या प्रशासकीय तयारीबाबत माहिती घेण्यात आली. मतमोजणी कक्षामध्ये नियोजित असलेल्या विविध व्यवस्थांचा सध्याचा आढावा यावेळी घेण्यात आला.

यानंतर मुख्य निवडणूक निरीक्षक सुधांशू यांनी चिंचवड येथील 'ब' क्षेत्रीय कार्यालयातील निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयास भेट दिली. आज नामनिर्देशन पत्रे भरण्याची अंतिम तारीख असल्याने या कार्यालयात सुरू असलेल्या नामनिर्देशन प्रक्रियेची माहिती त्यांनी घेतली. उमेदवारांकडून स्वीकारण्यात येणारी नामनिर्देशन पत्रे, त्याची नोंदणी प्रक्रिया, वेळापत्रकानुसार सुरू असलेले कामकाज तसेच कार्यालयातील व्यवस्थापन याबाबतची माहिती यावेळी सादर करण्यात आली.

दरम्यान, यावेळी आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांनी आकुर्डी प्राधिकरण येथील हेडगेवार भवन आणि थेरगाव येथील ग क्षेत्रीय कार्यालय निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयास भेट देऊन सुरू असलेल्या नामनिर्देशन प्रक्रियेची माहिती घेतली आणि प्रक्रिया सुरळीत पार पाडण्याबाबत सूचना केल्या.

**मतदान जनजागृती करणाऱ्या एलईडी व्हॅनचा मुख्य निवडणूक निरीक्षक यांच्या हस्ते शुभारंभ**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली व अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपायुक्त अण्णा बोदडे यांच्या अधिपत्याखाली राबविण्यात येत असलेल्या स्वीप कार्यक्रमांतर्गत एलईडी व्हॅनद्वारे मतदान जनजागृती करण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या उपक्रमाचा शुभारंभ मुख्य निवडणूक निरीक्षक निरंजन सुधांशू यांच्या हस्ते पिंपरी चिंचवड महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनात करण्यात आला. या एलईडी व्हॅनद्वारे मतदानाचे महत्त्व, मतदान प्रक्रिया आदींबाबत माहितीपूर्ण व्हिडिओ दाखवण्यात येणार असून त्यामधून पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीत मतदारांमध्ये जनजागृती करण्यात येणार आहे.

# ग्राहकांना पारदर्शक सेवा मिळण्याच्यादृष्टीने व्यापक स्वरुपात जनजागृती करावी : उपविभागीय अधिकारी वैभव नावडकर

**बारामती :** सद्याचे युग हे डिजिटल युग असून काळाची आव्हाने ओळखून ग्राहकांना विशेषत: तरुण पिढीला पारदर्शक सेवा मिळण्याकरीता ग्राहक परिषदेने व्यापकस्वरुपात जनजागृती करावी, असे आवाहन उपविभागीय अधिकारी, बारामती वैभव नावडकर यांनी केले.




राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त तहसील कार्यालय आणि अखिल भारतीय ग्राहक पंचायत बारामती तालुका यांच्या संयुक्त विद्यमाने पंचायत समिती सभागृह येथे आयोजित कार्यक्रमाच्या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निवासी स्वीय सहाय्यक नितीन हाटे, अति. महावितरणचे कार्यकारी अभियंता गणेश जमाले, तहसिलदार स्वप्नील रावडे, गटविकास अधिकारी किशोर माने, निवासी नायब तहसीलदार नामदेव काळे, पुरवठा निरीक्षण अधिकारी तितिक्षा बारापात्रे, प्रादेशिक परिवहन निरीक्षक श्री. प्रीतम कदम, ग्राहक पंचायत सदस्य बारामती ॲड. किरण शिंदे, अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे अध्यक्ष संजीव बोराटे, जागृत ग्राहक राजा पुणे जिल्हाध्यक्ष तथा ग्राहक संरक्षण परिषदेचे सदस्य दिलीप निंबाळकर आदी उपस्थित होते.

श्री. नावडकर यांनी महसूल विभागाच्यावतीने देण्यात येणाऱ्या सेवा ऑनलाईन पद्धतीने मिळत असल्याने नागरिकांच्या वेळेत बचत होत आहे. प्रत्येक गावात सेतू केंद्र, ई सेवा आदींच्या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांना शासकीय सेवा जलदगतीने सुविधा प्रदान करण्यात येते. याकरिता ऑनलाईन सुविधांची प्रणालीद्वारे होणाऱ्या पावतीनुसारच ग्राहकांनी सेवा शुल्क अदा करावे. शासकीय सेवांचा लाभ घेण्याकरिता विहीत शुल्कापेक्षा अधिक शुल्क अदा करण्याची आवश्यकता नाही तसेच विहित वेळेत सेवा न मिळाल्यास महाराष्ट्र सेवा हक्क कायद्याअंतर्गत संबंधित यंत्रणेकडे अपील करता येते, असेही श्री. नावडकर म्हणाले.

श्री. रावडे म्हणाले, समाजात ग्राहकाची फसवणूक होत असल्यास त्यांची व्यापक स्वरुपात जनजागृती करण्याची आवश्यकता आहे. नागरिकांची फसवणूक झाल्यास १९१५ या हेल्पलाइन क्रमांक किंवा ८८०००१९९५ या चॅटबॉट किंवा e-jagriti.gov.in संकेतस्थळद्वारे तक्रार दाखल करता येते, अधिकाधिक नागरिकांनी या सेवांचा लाभ घ्यावा, ग्राहकांनी आपल्या हक्काबाबत जागरुक राहावे, असे आवाहन श्री. रावडे यांनी केले.श्री. निंबाळकर म्हणाले, या वर्षीच्या राष्ट्रीय ग्राहक दिनाची संकल्पना 'जलद, सुलभ डिजिटल न्यायाकडे वाटचाल' अशी आहे. ग्राहक व्यवहार विभागाच्यावतीने ग्राहकांचे हक्कांचे संरक्षण करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या जागो ग्राहक जागो प, जागृती प आणि जागृती डॅशबोर्ड चा लाभ घ्यावा. या उपयोजकांमुळे (प्लिकेशन्स) ग्राहक व्यवहार विभागाला ई–कॉमर्स प्लॅटफॉर्मवरील अनैच्छिक बाबी (डार्क पॅटर्न) शोधून काढण्यासाठी साधने आणि संसाधनांसह मदत होणार आहे.

ग्राहक संरक्षण कायद्यातील नागरिकांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या तरतुदीविषयी श्री. निंबाळकर यांनी माहिती दिली. श्री. जमाले यांनी विद्युत वितरणप्रणाली मध्ये झालेल्या विविध बदलांबाबत व सुविधांबाबत तसेच श्री. हाटे यांनी विविध जनआरोग्य योजनांबाबत माहिती दिली. तसेच ॲड. शिंदे यांनी ग्राहकांनी वस्तू व सेवेचा लाभ घेतांना घ्यावयाची काळजी तसेच ग्राहक संरक्षण कायदा याबद्दल सविस्तर माहिती दिली.कार्यक्रमानंतर मान्यवरांनी पंचायत समिती कार्यालयाच्या प्रांगणात आयोजित प्रदर्शनास भेटी देत विविध विभागाच्यावतीने देण्यात येणाऱ्या सेवाबाबत माहिती घेतली.तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी फसवणूक नको ग्राहकाचे संरक्षण हवे, उत्कर्ष माध्यमिक आश्रमशाळा व कनिष्ठ महाविद्यालय, वाघळवाडी च्या विद्यार्थ्यांनी जागर जागृकतेचा, ग्राहकांच्या हक्काचा तसेच महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या ग.भि. देशपांडे हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी मी ग्राहक, मी राजा या पथनाट्याचे सादरीकरण केले.

यावेळी अखिल भारतीय ग्राहक पंचायत, ग्राहक संरक्षण परिषद, जागरूक ग्राहक राजा सामाजिक संस्था (ग्राहक संघटना), ग्राहक पंचायत महाराष्ट्र तालुका बारामतीचे पदाधिकारी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन ग्राम विकास अधिकारी नीलम देशमुख तसेच पुरवठा निरीक्षण अधिकारी तितिक्षा बारापत्रे यांनी आभार प्रदर्शन केले.

# कॅमेरामन संजय गायकवाड यांचा सेवापूर्तीनिमित्त सत्कार

## प्रत्येकाने कर्तव्यनिष्ठा, प्रामाणिकपणा व आत्मियभावनेने सेवा द्यावी- उपसंचालक डॉ. किरण मोघे

**पुणे :** पुणे विभागीय माहिती कार्यालयातील दूरदर्शन कॅमेरामन संजय विठ्ठल गायकवाड हे २७ वर्षाच्या सेवेनंतर नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत असल्याने विभागीय व जिल्हा माहिती कार्यालयाच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. साधनांच्या, परिस्थितीच्या, वेळेच्या अडचणी बाजूला सारुन संजय गायकवाड यांनी माहिती व जनसंपर्क विभागाप्रती कर्तव्यनिष्ठा, प्रामाणिकपणा व आत्मियभाव एकटवून सेवा दिली, असे कौतुकोद्गार माहिती उपसंचालक डॉ. किरण मोघे यांनी याप्रसंगी काढले. प्रत्येकाने शासकीय सेवा बजावताना अशी भूमिका ठेवावी, असेही ते म्हणाले.

सत्कार समारंभाला जिल्हा माहिती अधिकारी युवराज पाटील, सहायक संचालक सचिन गाढवे, श्री. गायकवाड यांची पत्नी संगीता व मुलगा सत्यम तसेच विभागीय व जिल्हा माहिती कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.



उपसंचालक डॉ. मोघे म्हणाले, शासकीय काम करत असताना वेगळेपण ही आपली ओळख असते. ती ओळख प्रत्येकाने जपणे गरजेचे असते, तशी वेगळी ओळख श्री. गायकवाड यांनी जपली. त्यांनी सध्याच्या युगाला अनुरुप सृजनशीलता जपण्याचे काम केले. काही व्यक्ती सेवानिवृत्त होऊ नयेत असे वाटणे हेच त्यांच्या कारकिर्दीचे यश असते. असे यशस्वी ठरुन संजय गायकवाड सेवानिवृत्त होत आहेत. प्रत्येक कर्मचाऱ्याने त्यांच्या आदर्श घ्यावा अशी व्यक्ती म्हणून त्यांना ओळखले जायचे, त्यांनी भावी आयुष्यात कुटूंबाला, स्वत:ची कला विकसित करण्याला वेळ द्यावा, असेही ते म्हणाले.

जिल्हा माहिती अधिकारी श्री. पाटील म्हणाले, श्री. गायकवाड यांनी समर्पण भावनेने काम केले. शासकीय सेवा बजावत असताना त्यांच्या विनोद बुद्धीमुळे सहकाऱ्यांच्या कामाचा ताण हलका होत असे. समर्पित भावनेने काम करणारे व्यक्ती कार्यालयाचे आयकॉन ठरतात. सध्या वेगवेगळ्या क्षेत्रात खूप शिकण्याच्या संधी असल्यातरी श्री. गायकवाड यांनी या क्षेत्रातच कार्य करत रहावे.सेवेमध्ये प्रत्येक अधिकाऱ्यांकडून वेगवेगळ्या गोष्टी शिकायला मिळाल्या. शासन सेवेत काम करताना यश एकट्याचे नसते. प्रत्येक काम हे सांघिक भावनेने केल्यास यश नक्की मिळते, असे श्री. गायकवाड अनुभव सांगताना म्हणाले.

यावेळी सचिन गाढवे, विलास कसबे तसेच कर्मचाऱ्यांनी मनोगत व्यक्त केले.

# पक्क्या अनुज्ञप्तीसाठी शिबीर दौऱ्याचे आयोजन

**पुणे :** पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून नागरिकांच्या सोईच्या व हिताच्या दृष्टीने जिल्ह्यात जानेवारी ते जून महिन्यात पक्क्या अनुज्ञप्तीसाठी शिबीर दौऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच हडपसर येथील जागेमध्ये ऑटोमेटेड ड्रायव्हिंग टेस्ट ट्रॅक उभारण्याचे काम सुरू होत असल्याने कामकाज पूर्ण होईपर्यंत हडपसर येथील शिबीर दौरा स्थगित केल्याचे प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे यांनी कळविले आहे.

पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत वेल्हा (पंचायत समिती विश्रामगृह) येथे ६ जानेवारी, १० फेब्रुवारी, १६ मार्च, २१ एप्रिल, २० मे व १८ जून; उरुळीकांचन (ग्रामपंचायत जिजाऊ सभागृह) येथे ५, १३ व २१ जानेवारी, ४, १२ व २५ फेब्रुवारी, ५, १८ व २५ मार्च, ७, १६ व २८ एप्रिल, ६, १२ व २१ मे, ४, १६ व २६ जून; शिक्रापूर (कोढापूरी विश्रामगृह) येथे १४ व २२ जानेवारी, ११ व १८ फेब्रुवारी, १२ व ३० मार्च, १३ व २२ एप्रिल, १८ व २९ मे, ५ व १५ जून; पिरंगुट (भैरवनाथ मंदिर मैदान) येथे १२ जानेवारी, ९ फेब्रुवारी, ११ मार्च, ८ एप्रिल, ११ मे, ९ जून; शिरुर (विश्रामगृह) येथे ८, २० व २८ जानेवारी, ५, १६ व २४ फेब्रुवारी, १०, १७ व २४ मार्च, ९, १५ व २९ एप्रिल, ५, १३ व २६ मे, १०, १७ व २४ जून; जेजुरी (आयटीआय कॉलेज मैदान) येथे २३ जानेवारी, २७ फेब्रुवारी, २७ मार्च, २४ एप्रिल, २२ मे, २५ जून; सासवड (विश्रामगृह) येथे ९ व १६ जानेवारी, १३ व २० फेब्रुवारी, १३ व २० मार्च, १० व १७ एप्रिल, ८ व १५ मे, १२ व १९ जून; तर भोर (जिल्हा परिषद विश्रामगृह) येथे ७ व १९ जानेवारी, ६ व १७ फेब्रुवारी, ९ व २३ मार्च, ६ व २० एप्रिल, ७ व १९ मे, ८ व २२ जून या दिवशी पक्की अनुज्ञप्ती शिबीर दौऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

शिबीर दौऱ्याच्या दिवशी जर शासनाची सुट्टी जाहीर झाली, तर त्या दिवसाचा दौरा आधीच्या दिवशी किंवा कामाच्या पुढच्या दिवशी घेण्यात येईल, असेही प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे यांनी कळविले आहे.

# पुणे निवडणूक आघाडीत बिघाडी, युतीत कुस्ती

**पुणे :** काँग्रेस–शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि मनसे आघाडीत जागा वाटप निश्चित झाले असताना प्रत्यक्षात तिन्ही पक्षांकडून उमेदवारी वाटताना जादा 'एबी फॉर्म'चे वाटप करण्यात आल्याने बिघाडी झाली आहे. हीच परिस्थिती शिवसेना–भाजपमध्ये झाल्याने युतीमध्ये कुस्ती झाली आहे. त्यामुळे यावर मार्ग कसा काढायचा, अशा प्रश्न सर्वच पक्षांपुढे उभा राहिल्याने नेत्यांची डोकेदुखी वाढणार आहे.

महापालिका निवडणुकीसाठी २३ डिसेंबरपासून उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात झाली. तेव्हापासून तर उमेदवारी अर्ज भरण्याच्या दिवसांपर्यंत युती–आघाडीत मोठ्या प्रमाणावर उलथापालथ झाली. कार्यकर्त्यांचा वाढता दबाव आणि युती–आघाडीचे नक्की चित्र स्पष्ट होत नसल्यामुळे सर्व पक्षांनी अर्ज भरण्यास काही तास शिल्लक राहिले असताना खिरापतीसारखे एबी फॉर्मचे वाटप केले..त्यामुळे रात्री उशिरापर्यंत भाजप वगळता अन्य पक्षाला अधिकृत उमेदवारांची यादी जाहीर करण्यात अडचणी आल्या. दरम्यान, गुरुवारी याबाबतचे चित्र पक्षांच्या पातळीवर स्पष्ट झाले. त्यामुळे अर्ज माघारी घेण्यास दोन दिवसांचा कालावधी आहे. तोपर्यंत तरी काही प्रभागांत चौरंगी, तर काही प्रभागांत पंचरंगी लढत होणार आहे..काँग्रेसकडून १०५; ठाकरेंच्या शिवसेनेकडून ६८काँग्रेस आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष यांच्या अधिकृत आघाडीची घोषणा झाली आहे, तर ठाकरेंची शिवसेना आणि मनसे यांच्यात युती झाली आहे. आघाडीच्या जागावाटपात काँग्रेसला १०० जागा, तर शिवसेनेला ६५ जागा आल्या होत्या. शिवसेनेने ६५ जागांमधून २१ जागा मनसेला देण्याचे निश्चित केले होते.प्रत्यक्षात काँग्रेसकडून १०५ हून अधिक उमेदवारांना एबी फॉर्मचे वाटप करण्यात आले असल्याचे सांगण्यात येत आहे.

# शापूरजी पल्लोनजी रियल एस्टेटने पुणे ग्रोथ कॉरिडोरमध्ये १०५ एकरांच्या प्रकल्पासह प्लॉटेड डेव्हलपमेंटमध्ये प्रवेश केला

**बारामती :** भारतातील विश्वासार्ह रिअल इस्टेट विकासकांपैकी एक असलेल्या शापूरजी पल्लोनजी रियल एस्टेट (SPRE) ने आज पुणे ग्रोथ कॉरिडोरमध्ये १०५ एकरांवरील प्रीमियम प्लॉटेड प्रकल्प 'ट्रीटोपिया'च्या माध्यमातून प्लॉटेड डेव्हलपमेंट क्षेत्रात प्रवेश केल्याची घोषणा केली. या प्रकल्पातून सुमारे ६०० कोटींच्या महसूलाची अपेक्षा आहे.

आगामी पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळ, प्रस्तावित आयटी पार्क तसेच प्रस्तावित इनर आणि आउटर रिंग रोड्सजवळ स्थित असलेला हा प्रकल्प, प्लॉटेड डेव्हलपमेंटसाठी वाढत्या मागणीच्या पार्श्वभूमीवर SPRE च्या निवासी पोर्टफोलिओचा धोरणात्मक विस्तार आहे. या प्रकल्पात २,००० ते ६,००० चौ.फुट क्षेत्रफळाच्या ४८३ नियोजनबद्ध निवासी प्लॉट्सचा समावेश असेल, जे अंतिम ग्राहक आणि दीर्घकालीन गुंतवणूकदारांसाठी डिझाइन करण्यात आले आहेत. कमी घनतेचा आणि निसर्गाधारित विकास म्हणून डिझाइन करण्यात आलेल्या या प्रकल्पात सुमारे ७० टक्के क्षेत्र मोकळ्या व हिरवळीच्या जागांसाठी राखीव आहे. सुमारे ६०० एकर जंगल क्षेत्राने वेढलेला हा प्रकल्प स्वच्छ हवा आणि निसर्गसंपन्न वातावरण प्रदान करतो. या प्रकल्पात सुमारे ३ एकरांचा क्लब हाऊस, सुमारे २५ एकरांची तलाव, सुमारे १.५ किमी लांबीचा लेकसाइड प्रोमेनेड आणि ३५ पेक्षा अधिक जागतिक दर्जाच्या सुविधा असतील. यामध्ये धरण, बार्बेक्यू झोन्स तसेच विविध मनोरंजन आणि वेलनेस सुविधा समाविष्ट आहेत. १८ मीटर रुंद, वृक्षराजीने सजलेला सेंट्रल अव्हेन्यू सर्व निवासी प्लॉट्सना सामायिक सुविधांशी जोडेल.


प्रकल्पाच्या लॉन्चवेळी प्रतिक्रिया देताना, शापूरजी पल्लोनजी रियल एस्टेटचे सीईओ श्री. सुमित सप्रू म्हणाले, पुणे ग्रोथ कॉरिडोर सुधारित कनेक्टिव्हिटी आणि वाढत्या निवासी मागणीमुळे एक महत्त्वाचा इन्फ्रास्ट्रक्चर–आधारित बाजार म्हणून उदयास येत आहे. प्लॉटेड डेव्हलपमेंटबाबत घरखरेदीदारांमध्ये वाढती रुची पाहता, ट्रीटोपिया हा आमच्या निवासी पोर्टफोलिओसाठी महत्त्वाचा टप्पा आहे. ते पुढे म्हणाले, मोठ्या पायाभूत सुविधा प्रकल्पांमुळे या भागाचा विकास वेग घेत आहे. पुणे ग्रोथ कॉरिडोर भविष्यात एक उच्च क्षमतेचा मायक्रो–मार्केट ठरेल आणि ट्रीटोपिया या दीर्घकालीन वाढीचा लाभ घेत ग्राहकांना मालकी व विकासातील लवचिकता प्रदान करेल.

ट्रीटोपिया येथे वैयक्तिक ७/१२ असलेले एन.ए. प्लॉट्स उपलब्ध असतील, ज्यामुळे ग्राहकांना त्यांच्या गरजेनुसार स्वतंत्र व्हिला उभारता येतील. रहिवाशांना हडपसर, हडपसर ॲनेक्स, एसपी इन्फोसिटी, मगरपट्टा आणि खराडी तसेच पुण्यातील प्रमुख शैक्षणिक व आरोग्य संस्थांपर्यंत सुलभ पोहोच मिळेल.

# एनआयए प्रमुख सदानंद दाते आता महाराष्ट्राचे नवे पोलिस महासंचालक, ३ जानेवारीला स्वीकारणार पदभार

**मुंबई :** भारतीय पोलीस सेवेतील अधिकारी सदानंद दाते यांची महाराष्ट्र पोलीस महासंचालक (DGP) म्हणून नियुक्ती निश्चित झाली आहे. राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला सेवानिवृत्त होणार आहेत. त्यांच्या जागी नवीन पोलिस महासंचालक कोण असेल याची चर्चा गेल्या महिन्यापासून सुरू होती. राज्याच्या गृह विभागाने त्यासाठी सात ज्येष्ठ आयपीएस अधिकाऱ्यांची नावे केंद्रीय लोकसेवा आयोगाकडे पाठवली होती.

राष्ट्रीय तपास संस्थेचे (एनआयए) प्रमुख सदानंद दाते यांचे नाव यात प्रामुख्याने चर्चेत होते. केंद्रीय लोकसेवा आयोगाने सातपैकी तीन नावांची निवड करून ती राज्य सरकारकडे पाठवली होती. त्यातून सदानंत दाते यांच्या नियुक्तीवर आज शिक्कामोर्तब करण्यात आले.एका अधिकृत निवेदनात महाराष्ट्र सरकारने म्हटले आहे की, महाराष्ट्र राज्याच्या पोलीस महासंचालक




(डीजीपी) भारतीय पोलीस सेवा रश्मी शुक्ला यांचा 'महाराष्ट्र राज्याचे पोलीस महासंचालक' म्हणून कार्यकाळ ३ जानेवारीला २०२६ रोजी संपत आहे. त्यानंतर सदानंद दाते पदभार स्वीकारतील.

**महाराष्ट्राच्या डीजीपीचा कार्यकाळ किती वर्षांचा असेल?**

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या पॅनेलमेंट समितीने शिफारस केलेल्या पॅनेलमध्ये समाविष्ट असलेले सदानंद वसंत दाते, भारतीय पोलिस सेवा यांची 'महाराष्ट्र राज्याचे पोलिस महासंचालक (एचओपीएफ)' या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. निवेदनात म्हटले आहे की, सर्वोच्च न्यायालयाच्या संबंधित निकाल आणि आदेशांनुसार, 'पोलीस महासंचालक (HOPF)' या पदावर नियुक्त झालेल्या भारतीय पोलीस सेवेच्या अधिकाऱ्याचा कार्यकाळ दोन वर्षांचा असेल. त्यानुसार, भारतीय पोलीस सेवेचे सदानंद वसंत दाते हे नियुक्तीच्या तारखेपासून दोन वर्षांच्या कालावधीसाठी 'पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य (HOPF)' या पदावर राहतील.

सदानंद दाते १ एप्रिल २०२४ पासून राष्ट्रीय तपास संस्थेचे (एनआयए) महासंचालक (डीजी) होते. यापूर्वी त्यांनी सीबीआयमध्ये उपमहानिरीक्षक (डीआयजी), महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाचे (एटीएस) प्रमुख, मुंबईतील सह पोलिस आयुक्त (गुन्हे आणि कायदा आणि सुव्यवस्था) आणि मीरा-भाईंदर आणि वसई-विरार प्रदेशांचे पोलिस आयुक्त म्हणून काम पाहिले आहे.

दाते यांनी वाणिज्य विषयात पदव्युत्तर पदवी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून डॉक्टरेट (पीएच.डी.), इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अकाउंटंट्स ऑफ इंडियामधून पात्र कॉस्ट अँड मॅनेजमेंट अकाउंटंट आणि हम्फ्रे फेलोशिप अंतर्गत मिनेसोटा विद्यापीठात व्हाइट-कॉलर आणि संघटित गुन्हेगारी नियंत्रणाचा अभ्यास केला आहे.

## 'सीबीएसई'च्या दहावी-बारावी परीक्षांच्या तारखांमध्ये बदल

**पुणे :** केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने (सीबीएसई) दहावी आणि बारावीच्या परीक्षेत बदल केला आहे. काही प्रशासकीय कारणांमुळे ३ मार्च २०२६ रोजी होणारे पेपर पुढे ढकलले आहे. सुधारित तारखा अधिकृतपणे जाहीर केल्या आहेत. 'सीबीएसई'ने परिपत्रकाद्वारे ही माहिती दिली.

सुधारित वेळापत्रकानुसार दहावीची तीन मार्चला होणारी परीक्षा आता ११ मार्चला, तर बारावीची १० एप्रिलला होईल. या दोन परीक्षांव्यतिरिक्त इतर सर्व विषयांच्या परीक्षा पूर्वनियोजित वेळापत्रकानुसारच होणार आहेत.'सीबीएसई'ने सर्व संलग्न शाळांच्या मुख्याध्यापकांना ही माहिती विद्यार्थ्यांपर्यंत आणि पालकांपर्यंत तातडीने पोहोचवण्याचे आदेश दिले आहेत. यासाठी शाळा प्रशासन, विद्यार्थी आणि पालकांनी सहकार्य करावे, असे आवाहनही 'सीबीएसई'चे परीक्षा नियंत्रक डॉ. संयम भारद्वाज यांनी केले आहे.

## हॉटेल आणि बार पहाटे ५ वाजेपर्यंत सुरु राहणार; राज्य सरकारचा मोठा निर्णय




**मुंबई :** सरत्या वर्षाला निरोप देऊन २०२६ या नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी सज्ज झालेल्या लोकांसाठी राज्य सरकारने एक मोठी आनंदाची बातमी दिली आहे. ३१ डिसेंबरच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व हॉटेल्स, रेस्टॉरंट्स आणि आर्केस्ट्रा बार पहाटे ५ वाजेपर्यंत उघडे ठेवण्यास अधिकृत परवानगी देण्यात आली आहे.राज्य सरकारने जारी केलेल्या आदेशानुसार, ही सवलत केवळ बंदिस्त किंवा इनडोअर आस्थापनांसाठीच लागू असेल. खुल्या जागा, टेरेस किंवा मोकळ्या मैदानावरील सेलिब्रेशनला ही वेळ मर्यादा लागू असणार नाही. त्यामुळे बंदिस्त हॉल किंवा हॉटेल्समध्ये नागरिकांना पहाटेपर्यंत जल्लोष करता येणार आहे.

**सुरक्षेसाठी पोलिसांचा 'तगडा' बंदोबस्त**

या काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिसांनी कंबर कसली आहे. नाक्या-नाक्यावर तगडा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून विशेषतः 'ड्रंक अँड ड्राईव्ह' आणि अमली पदार्थांच्या विरोधात पोलिसांची विशेष करडी नजर असणार आहे. नागरिकांनी उत्साहात आणि आनंदाने नवीन वर्षाचे स्वागत करावे, मात्र कायद्याचे उल्लंघन होणार नाही याची काळजी घ्यावी. नियमांचे पालन न करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई केली जाईल.

**– मिलिंद भारंबे, पोलीस आयुक्त, नवी मुंबई**

## १ जानेवारी २०२६ पासून मुंबई-पुणे रेल्वेच्या वेळापत्रकात बदल

**पुणे :** जर तुम्ही नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी प्रवास किंवा रेल्वे प्रवासाचे नियोजन केले असेल, तर ही बातमी महत्त्वाची आहे. १ जानेवारी २०२६ पासून मध्य रेल्वेच्या वेळापत्रकात मोठे बदल होणार आहेत. मुंबई आणि पुण्याला जोडणाऱ्या अनेक महत्त्वाच्या गाड्यांच्या वेळेत बदल करण्यात आले आहेत. ज्यामध्ये हाय-स्पीड वंदे भारत एक्स्प्रेसचाही समावेश आहे. त्यामुळे घरून निघण्यापूर्वी तुमच्या ट्रेनचे वेळापत्रक नक्की तपासा.

रेल्वे प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, प्रवाशांसाठी प्रवास अधिक आरामदायी करण्यासाठी आणि गाड्यांचा वेग वाढवण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. १ जानेवारीपासून लागू होणाऱ्या या नवीन वेळापत्रकामुळे मुंबईहून निघणाऱ्या आणि मुंबईत येणाऱ्या गाड्यांच्या सुटण्याच्या वेळेत ५ ते १५ मिनिटांचा फरक जाणवेल. अलीकडे किंवा त्यापूर्वीही अनेक गाड्यांच्या वेळेत बदल करण्यात आले आहेत.






मुंबई-पुणे-सोलापूर आणि मुंबई-साईनगर शिर्डी मार्गावरील वंदे भारत एक्स्प्रेस ट्रेनच्या वेळेत काही मिनिटांनी बदल करण्यात आला आहे. प्रवाशांची वाढती संख्या आणि तांत्रिक सुधारणांमुळे हा बदल करण्यात आल्याचे मानले जात आहे. परिणामी प्रवाशांना आता बदललेल्या वेळेनुसार प्लॅटफॉर्मवर उपस्थित राहणे आवश्यक असेल.

केवळ वंदे भारतच नाही तर मुंबई-पुणे मार्गावरील इंजीवनरेषाड मानल्या जाणाऱ्या इंटरसिटी, सिंहगड एक्सप्रेस आणि डेक्कन क्वीन यासारख्या गाड्यांच्या वेळाही थोड्या बदलण्याची शक्यता आहे. शिवाय रेल्वेने सकाळी मुंबईत येणाऱ्या किंवा रात्री निघणाऱ्या लांब पल्ल्याच्या गाड्यांचे प्लॅटफॉर्म आणि वेळा बदलल्या आहेत..

रेल्वेने प्रवाशांना प्रवास सुरू करण्यापूर्वी 'NTES' ॲपवर किंवा रेल्वेच्या अधिकृत वेबसाइटवर त्यांच्या ट्रेनचे 'लाइव्ह स्टेटस' तपासण्याचे आवाहन केले आहे. जर तुम्ही जुन्या वेळापत्रकानुसार स्टेशनवर पोहोचलात तर तुमची ट्रेन चुकण्याची किंवा बराच वेळ वाट पाहण्याची शक्यता असते. रेल्वे अधिकाऱ्यांनी म्हटले आहे की, नवीन वर्षात हा बदल रेल्वेची कार्यक्षमता वाढवण्यासाठी आणि प्रवाशांचा वेळ वाचवण्यासाठी उचललेले पाऊल आहे.

## नूतन वर्ष महाराष्ट्राचे, महाराष्ट्राच्या समृद्धीचे, विकासाचे नवपर्व आणणारे : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई :** नूतन वर्ष महाराष्ट्राचे, महाराष्ट्राच्या समृद्धीचे, विकासाचे नवपर्व आणणारे ठरेल, असा विश्वास व्यक्त करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील नागरिकांना नववर्ष प्रारंभाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

सरत्या वर्षाला निरोप देताना आणि नवीन वर्ष प्रारंभाच्या पूर्वसंध्येला दिलेल्या शुभेच्छा संदेशात मुख्यमंत्री फडणवीस म्हणतात, 'सरत्या वर्षातील कटू प्रसंगांना विसरूया आणि सुमधूर आठवणींकडून प्रेरणा घेत, पुढे जाऊया. महाराष्ट्र सर्वच क्षेत्रात अग्रेसर, नेतृत्व करणारे राज्य आहे. महाराष्ट्राच्या प्रगतीची पताका अशीच फडकत राहो, यासाठी आपण एकजूट करूया. महाराष्ट्राच्या मातीत आव्हाने स्वीकारण्याची धमक आहे. आव्हाने आलीच, तर त्यावर मात करण्याचा निर्धार करूया. नवे वर्ष नवचैतन्य घेऊन येणारे, आशा, आकांक्षांना बळ देणारे ठरेल, अशी आशा व्यक्त करून मुख्यमंत्री फडणवीस यांनी नववर्ष सर्वांसाठी आरोग्यदायी, सर्वच क्षेत्रात भरभराट, समृद्धी घेऊन येणारे ठरावे, अशा शुभेच्छा दिल्या.

**नववर्ष महाराष्ट्रासाठी विकासाच्या नव्या संधी घेऊन येईल –उपमुख्यमंत्री अजित पवार**

राज्यातील नागरिकांच्या सक्रिय सहभागातून, आधुनिक तंत्रज्ञानाच्या प्रभावी



वापरासह दूरदर्शी नियोजनाच्या माध्यमातून 'विकसित महाराष्ट्र' साकारण्याच्या दिशेने ठोस पावले उचलली जात आहेत. त्यामुळे 'विकसित भारत २०४७' या राष्ट्रीय उद्दिष्टपूर्तीत महाराष्ट्र आपली महत्त्वपूर्ण भूमिका यशस्वीपणे बजावेल, असा दृढ विश्वास व्यक्त करत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्यातील जनतेला नववर्ष २०२६च्या मन:पूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत. येणारं नवीन वर्ष महाराष्ट्राला सर्वांगीण प्रगतीच्या मार्गावर अधिक वेगाने घेऊन जाईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार आपल्या शुभेच्छा संदेशात म्हणतात की, महाराष्ट्रवासियांच्या एकजूट आणि निर्धाराच्या बळावर राज्याने आतापर्यंत प्रत्येक आव्हानावर यशस्वीपणे मात केली आहे. ही एकजूट कायम ठेवत विकासाची वाटचाल अधिक भक्कम करण्याचा शासनाचा ठाम संकल्प आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'विकसित भारत २०४७' या संकल्पपूर्तीत महाराष्ट्राची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून, त्याअनुषंगाने राज्याची अर्थव्यवस्था २०२८ पर्यंत एक ट्रिलियन डॉलरपर्यंत नेण्याचं ध्येय निश्चित करण्यात आले आहे. महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास हाच शासनाचा एकमेव अजेंडा असून, त्यासाठी दर्जेदार पायाभूत सुविधा उभारणी, लोककल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी तसेच शहरी व ग्रामीण भागाचा समतोल विकास साधण्यावर भर दिला जात आहे. नागरिकांचा सक्रिय सहभाग, आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरासह प्रभावी नियोजनाच्या माध्यमातून 'विकसित महाराष्ट्र' साकारण्यासाठी ठोस आणि निर्णायक पावले उचलली जात आहेत.

कृषी, उद्योग, शिक्षण, सहकार, कला-संस्कृती तसेच सामाजिक क्षेत्रात महाराष्ट्राचे अग्रस्थान कायम ठेवण्यासाठी सर्वांनी एकजुटीने प्रयत्न करावेत, असे आवाहन करत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नववर्षाचे स्वागत उत्साहात, मात्र संयम आणि आरोग्यभान राखत करण्याचं आवाहन केले आहे.

## परभणीसाठी उदयोन्मुख जिल्हा दर्जा, झोन-१ व डी+ श्रेणी मंजूर

**मुंबई :** परभणी जिल्ह्यासाठी नववर्षाच्या पूर्वसंध्येला एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला असून, महाराष्ट्र औद्योगिक गुंतवणूक व सेवा धोरण २०२५ अंतर्गत परभणी जिल्ह्याचा उदयोन्मुख जिल्हा म्हणून समावेश करण्यात आला आहे. हा निर्णय परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे- बोर्डीकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे शक्य झाला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा नेहमीच प्रयत्न असतो की, राज्यातील प्रत्येक जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न वाढले पाहिजे. या व्यापक उद्दिष्टमध्ये परभणी जिल्ह्याचाही समावेश व्हावा, यासाठी विशेष प्रयत्न केल्याबद्दल राज्यमंत्री श्रीमती बोर्डीकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मनापासून आभार मानले आहेत.

नवीन धोरणानुसार -परभणी जिल्ह्याचा समावेश झोन-१ मध्ये करण्यात आला आहे.

नवीन धोरणांतर्गत झोन-१ मध्ये देशाच्या सरासरीपेक्षा कमी प्रतिव्यक्ती उत्पन्न असलेले जिल्हे समाविष्ट असतात केलेले आहेत. झोन-१ मध्ये समावेश झाल्यामुळे परभणीतील गुंतवणूकदारांना विशेष प्रोत्साहन सवलती मिळणार आहेत.

तसेच परभणी जिल्हा डी+ श्रेणी मध्ये कायम ठेवण्यात आला असून, या झोनमध्ये राज्यातील सर्वाधिक औद्योगिक प्रोत्साहन सवलती दिल्या जातात. या निर्णयामुळे नवीन उद्योग, गुंतवणूक, रोजगार निर्मिती आणि स्थानिक आर्थिक विकासाला मोठी चालना मिळणार आहे.

राज्यमंत्री साकोरे-बोर्डीकर यांनी परभणी जिल्ह्याच्या औद्योगिक मागासलेपणाचा विचार करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे परभणीसाठी विशेष झोन दर्जाची मागणी केली होती. ही मागणी मंजूर होऊन राज्याच्या औद्योगिक धोरणात समाविष्ट करण्यात आली आहे.